# प्रेस नोट

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक - ०२/०२/२०१८

## वानवडी पोलीसांकडुन ०१ देशी बनावटीचे पिस्टल जप्त

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर कडील अधिकारी व कर्मचारी यांनी इसम नामे छोटेलाल रामदुलारे गुप्ता वय ३६ वर्षे रा.बिल्डींग ए, रुम नंबर १२, म्हाडा कॉलनी, हडपसर, पुणे यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व एक जिवंत राऊंड हस्तगत करण्यात आले आहेत.

वानवडी पोलीस ठाणेकडील पो.ना.युवराज दुधाळ यांना विश्वसनीय माहीती मिळाली की, पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे छोटेलाल रामदुलारे गुप्ता वय ३६ वर्षे रा.बिल्डींग ए, रुम नंबर १२, म्हाडा कॉलनी, हडपसर, पुणे हा त्याचेजवळील एक देशी बनावटीचे पिस्टल बेकायदेशिरपणे घेवुन गायकवाड चाळ समोरील रोडवर, रेल्वे पटरीचे जवळ, सैय्यदनगर, हडपसर, पुणे येथे येणार आहे. त्या अनुषंगाने वानवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा लावुन गुन्हेगार नामे छोटेलाल रामदुलारे गुप्ता यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचेजवळ एकुण ४०,२००/- रुपये किमतीचे एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व एक जिवंत राऊंड असा मुद्देमाल मिळुन आल्याने तो दाखल गुन्ह्याचे पुरावेकामी जप्त करण्यात आलेला आहे.

आरोपीकडे सखोल तपास करता त्याने सदरचे पिस्टल हे गेली पाच महिन्यांपुर्वी विजय बढे रा.काळेपडळ हडपसर पुणे नावाच्या व्यक्तीकडुन २५,०००/- रुपयांना विकत घेतले असल्याचे सांगीतले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त श्री दिपक साकोरे सो, परिमंडळ-४ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री मिलिंद पाटील सो, वानवडी विभाग पुणे शहर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सयाजी गवारे सो, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री अजय म्हेत्रे, पो.हवा.रमेश भोसले, पो.ना.सुदर्शन बोरावके, पो.शि.शिरीष गोसावी, पो.शि.कानिफनाथ कारखेले, पो.शि.योगेश गायकवाड, पो.शि.प्रतीक लाहीगुडे पो.शि.नवनाथ खताळ, यांच्या पथकाने केली.